# नि.दि.मु.क्र.०१/२०१५ मधील निशाणी क्र.२९१ वरील आदेश

# (**CNRNo.MHSI**09000032015)

०१. अर्ज व त्यावरील प्रतिवादींचा जबाब वाचला. उभय पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०२. प्रस्तूतच्या अर्जान्वये प्रतिवादी क्र.१८ दत्ताराम अनंत घाडी यांच्या वारसांना दाव्याच्या अभिलेखावर घेण्यास विनंती केलेली आहे. दप्तरी दाखल असलेल्या मृत्यूप्रमाणपत्रावरुन प्रतिवादी क्र.१८ दत्ताराम अनंत घाडी हे दि.३०/०५/२०२२ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र. १८अ ते १८क हेच मयत प्रतिवादी क्र.१८ चे वारस असल्याचे अर्जात नमूद केलेले आहे. दाव्याचे स्वरुप बघता दाव्याचे कारण अबाधित राहत असल्याने व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका २२ ची व्याप्ती लक्षात घेता अर्ज मंजूर करणे न्यायसंगत वाटते. परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

## – आदेश –

०१. निशाणी क्र. २९१ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. अर्जाच्या अनुषंगाने वादीने मयत प्रतिवादी क्र. १८ यांचे वारस दाव्यात समाविष्ट करुन दुरूस्ती प्रत पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी दाखल करावी.

३. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2022.08.03 11:01:54 +0530

स्थळ : देवगड (एस.बी.वाळके)

दिनांक : ०२/०८/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.